REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X

VOLUME - 8 | ISSUE - 5 | FEBRUARY - 2019

# भंडारा जिल्ह्यातील त्रीस्तरीय पंचायतराज व्यवस्थेमधील पदाधिकाऱ्याचे समाजशास्त्रीय अध्ययन

डॉ. मीनाक्षी श्रीहरी बेसेकर
समाजशास्त्र विभागप्रमुख,
श्रीमती गोपीकाबाई भुरे महिला महाविद्यालय, तुमसर, जिल्ह्या- भंडारा.

## सारांश



महाराष्ट्रातील भंडारा जिल्ह्यात अनेक समस्या असून विकासाची समस्या गंभीर बनली आहे. प्रत्यक्षात भंडारा जिल्ह्यात अंधश्रद्धा, निरक्षरता, आरोग्य, शिक्षण, राहाणीमान, रोजगार व आर्थिक मागासलेपण इत्यादी गंभीर प्रश्न आहेत. या जिल्ह्याकरिता विविध विकास योजना राबविण्यात आल्या असल्या तरी जिल्ह्याचा पाहिजे तितका विकास व सुधारणा झालेली नसल्याचेच प्रथमदृष्ट्या निदर्शनास येते. प्रस्तुत संशोधनात भंडारा जिल्ह्यातील त्रीस्तरीय पंचायतराज व्यवस्थेमधील एकूण ३३० पदाधिकाऱ्यांकडुन संकलीत करण्यात आलेल्या माहितीचे विश्लेषण करण्यात आले.

## प्रस्तावना

७३ व्या घटना दुरूस्ती नंतर भारतातील प्रत्येक राज्यात त्रीस्तरीय पंचायतराज व्यवस्था लागू करण्यात आली पंचायत समिती व स्थानिक स्वराज्य संस्थांना मोठया प्रमाणात निर्णय अधिकार व हक्क देण्यात आले व याच्या अंमलबजावणीचे अधिकार देखील पंचायतराज व स्थानिक स्वराज्य संस्था पदाधिकाऱ्यांच्या सुपूर्द करण्यात आले. असे असून देखील देशातील बहुतांश क्षेत्रात सुधरणा झाल्याचे दिसून येत नाही.

याच अनुशंगाने सदर संशोधनात पंचायतराज व स्थानिक स्वराज्य संस्था पदाधिकाऱ्यांच्या भूमिकेचा अभ्यास करण्यात आला आहे. सदर संशोधना अंतर्गत पंचायतराज व स्थानिक स्वराज्य संस्था पदाधिकाऱ्यांच्या पंचायतराज संस्थेसंदर्भातील जाणिवजागृतीचा आढावा घेण्यात आला आहे. त्याचप्रमाणे त्यांचा पंचायतराज संस्थेच्या कार्यात सहभाग, सामाजिक विकासात सहभाग व त्याचे परिणाम याचे देखिल विवेचन करण्यात आले आहे. तसेच पंचायतराज संस्थेअंतर्गत विविध विकास योजना राबवितांना त्यांना येणाऱ्या सामाजिक,

आर्थिक, प्रशासनिक, राजकीय व कौटुंबिक समस्यांचा देखील शोध घेण्यात आला. पंचायतराज व स्थानिक स्वराज्य संस्थांमधे महिला आरक्षणामुळे महिला प्रतिनिधींची संख्या व सहभागावर काही परिणाम झाला आहे किंवा नाही याचा आढावा देखील या संशोधनात घेण्यात आला आहे. या अनुशंगाने सदर संशोधन हे महत्वपूर्ण आहे. या संशोधनातून प्राप्त निष्कर्ष व शिफारशी या भंडारा जिल्ह्यातील पंचायतराज व स्थानिक स्वराज्य संस्था पदाधिकारी व प्रतीनिधींकरिता तसंच शासन व योजनाकारांना उपयोगी ठरतील.

वरिल बाबी लक्षात घेता, “भंडारा जिल्ह्यातील त्रीस्तरीय पंचायतराज व्यवस्थेमधील पदाधिकाऱ्याचे समाजशास्त्रीय अध्ययन” या शिर्षकाअंतर्गत हे संशोधन कार्य करण्यात आले आहे.

**सारणी क्रमांक १: त्रीस्तरीय पंचायतराज व्यवस्थेमधील पदाधिकाऱ्याचे त्यांच्या शैक्षणिक स्थितीनूसार वर्गीकरण**

| शिक्षण | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|
| निरक्षर | २ | ०.६ |
| प्राथमिक | २३ | ७.० |
| माध्यमिक | ११९ | ३६.१ |
| उच्च माध्यमिक | १३३ | ४०.३ |
| स्नातक | ३७ | ११.२ |
| स्नाकोत्तर | १० | ३.० |
| इतर | ६ | १.८ |
| **एकूण** | **३३०** | **१००** |
| Chi-Square | Df | Sig |
| ७०५.५५९ | ६ | <०.०५ |

उपरोक्त सारणी क्रमांक १ मध्ये भंडारा जिल्ह्यातील त्रीस्तरीय पंचायतराज व्यवस्थेमधील पदाधिकाऱ्यांचे त्यांच्या शैक्षणिक स्थितीनूसार वर्गीकरण दर्शविण्यात आले आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनूसार ०.६ टक्के पदाधिकारी निरक्षर असून ७.० टक्के पदाधिकाऱ्यांने प्राथमिक स्तरापर्यंत शिक्षण प्राप्त केले होते. तसेच ३६.१ टक्के, ४०.३ टक्के व ११.२ टक्के अनुक्रमे पदाधिकाऱ्यांनी माध्यमिक, उच्च माध्यमिक व स्नातक स्तरापर्यंत शिक्षण प्राप्त केले होते. त्याचप्रमाणे ३.० टक्के अधिकाऱ्यांनी स्नातकोत्तर स्तरापर्यंत शिक्षण प्राप्त केले असून १.८ टक्के पदाधिकाऱ्यांनी इतर स्तरापर्यंत शिक्षण प्राप्त केले होते.

काई वर्ग चाचणीच्या परिणामांवरून असे निदर्शनास येते की, शैक्षणिक स्थितीनूसार भंडारा जिल्ह्यातील त्रीस्तरीय पंचायतराज व्यवस्थेमधील पदाधिकाऱ्यांदरम्यान सार्थक *(P<0.05)* फरक आहे. म्हणजेच भंडारा जिल्ह्यातील त्रीस्तरीय पंचायतराज व्यवस्थेमधील पदाधिकाऱ्यांमध्ये उच्च माध्यमिक स्तरापर्यंत शिकलेल्या पदाधिकाऱ्यांची संख्या इतर पदाधिकाऱ्यांच्या तूलनेत महत्वपुर्णपणे अधिक आहे.

### सारणी क्रमांक २: त्रीस्तरीय पंचायतराज व्यवस्थेमधील पदाधिकाऱ्यांच्या गावात अथवा शहरात उपलब्ध सामाजिक संस्थेतील सदस्यतेसंबंधी माहिती

| गावात/शहरात उपलब्ध सामाजिक संस्थेचे सदस्यत्व | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | १०८ | ३२.७ |
| नाही | १२२ | ६७.३ |
| **एकूण** | **३३०** | **१००** |
| Chi-Square | Df | Sig |
| ७०.७२७ | १ | <०.०५ |

उपरोक्त सारणी क्रमांक २ मध्ये भंडारा जिल्ह्यातील त्रीस्तरीय पंचायतराज व्यवस्थेमधील पदाधिकाऱ्यांच्या गावात अथवा शहरात उपलब्ध सामाजिक संस्थेतील सदस्यतेसंबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनूसार ३२.८ टक्के पदाधिकारी त्यांच्या गावात अथवा शहरात उपलब्ध सामाजिक संस्थेत सदस्य होते. तसेच ६७.२ टक्के पदाधिकाऱ्यांची त्यांच्या गावात अथवा शहरातील सामाजिक संस्थेत सदस्यता नव्हती.

काई वर्ग चाचणीच्या परिणामांवरून असे निदर्शनास येते की, गावात अथवा शहरात उपलब्ध सामाजिक संस्थेतील सदस्यतेनूसार भंडारा जिल्ह्यातील त्रीस्तरीय पंचायतराज व्यवस्थेमधील पदाधिकाऱ्यांदरम्यान सार्थक *(P<0.05)* फरक आहे. म्हणजेच भंडारा जिल्ह्यातील त्रीस्तरीय पंचायतराज व्यवस्थेमधील पदाधिकाऱ्यांमध्ये गावात अथवा शहरातील सामाजिक संस्थेत सदस्य नसणाऱ्या पदाधिकाऱ्यांची संख्या इतर पदाधिकाऱ्यांच्या तूलनेत महत्वपुर्णपणे अधिक आहे.

### सारणी क्रमांक ३: त्रीस्तरीय पंचायतराज व्यवस्थेमधील पदाधिकाऱ्यांद्वारे गावात अथवा शहरात उपलब्ध सामाजिक संस्थांच्या माध्यमातून सामाजिक समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करण्यासंबंधी माहिती

| या संस्थांच्या माध्यमातून सामाजिक समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|
| अंशत: | १९६ | ५९.४ |
| पुर्णत: | १०८ | ३२.७ |
| मुळीच नाही | २६ | ७.९ |
| **एकूण** | **३३०** | **१००.०** |
| Chi-Square | Df | Sig |
| २३८.७७ | २ | <०.०५ |

उपरोक्त सारणी क्रमांक ३ मध्ये भंडारा जिल्ह्यातील त्रीस्तरीय पंचायतराज व्यवस्थेमधील पदाधिकाऱ्यांद्वारे गावात अथवा शहरात उपलब्ध सामाजिक संस्थांच्या माध्यमातून सामाजिक समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करण्यासंबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनूसार ५९.४ टक्के पदाधिकाऱ्यांद्वारे गावात अथवा शहरात उपलब्ध सामाजिक संस्थांच्या माध्यमातून सामाजिक समस्या सोडविण्यासाठी अंशत: प्रयत्न केले जाते तर ३२.७ टक्के

पदाधिकाऱ्यांद्वारे गावात अथवा शहरातील सामाजिक समस्या सोडविण्यासाठी पुर्णत: प्रयत्न करण्यात येते. तसेच ७.९ टक्के पदाधिकाऱ्यांद्वारे गावात अथवा शहरात उपलब्ध सामाजिक संस्थांच्या माध्यमातून सामाजिक समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करण्यात येत नाही.

काई वर्ग चाचणीच्या परिणामांवरून असे निदर्शनास येते की, गावात अथवा शहरात उपलब्ध संस्थांच्या माध्यमातून सामाजिक समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करण्यानूसार भंडारा जिल्ह्यातील त्रीस्तरीय पंचायतराज व्यवस्थेमधील पदाधिकाऱ्यां दरम्यान सार्थक (P<0.05) फरक आहे. म्हणजेच भंडारा जिल्ह्यातील त्रीस्तरीय पंचायतराज व्यवस्थेमधील पदाधिकाऱ्यांमध्ये संस्थांच्या माध्यमातून सामाजिक समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या पदाधिकाऱ्यांची संख्या इतर पदाधिकाऱ्यांच्या तूलनेत महत्वपुर्णपणे अधिक आहे.

**सारणी क्रमांक ४: सामाजिक विकासात असलेल्या स्वत:च्या सहभागाच्या प्रमाणासंबंधी त्रीस्तरीय पंचायतराज व्यवस्थेमधील पदाधिकाऱ्यांची प्रतिक्रीया**

| **सामाजिक विकासात असलेल्या सहभागाचे प्रमाण** | **वारंवारीता** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| अंशत: | १८७ | ५६.७ |
| पुर्णत: | १४३ | ४३.३ |
| लागू होत नाही | – | – |
| **एकूण** | **३३०** | **१००** |
| Chi-Square | Df | Sig |
| ३१६.८१ | २ | <0.05 |

उपरोक्त सारणी क्रमांक ४ मध्ये त्रीस्तरीय पंचायतराज व्यवस्थेमधील पदाधिकाऱ्यांची सामाजिक विकासात असलेल्या स्वत:च्या सहभागाच्या प्रमाणासंबंधी प्रतिक्रीया दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनूसार ५६.७ टक्के पदाधिकाऱ्यांच्या मते त्यांचा सामाजिक विकासात अंशत: सहभाग होता. तसेच ४३.३ टक्के पदाधिकाऱ्यांच्या मते त्यांचा गावातील सामाजिक विकासात पुर्णत: सहभाग होता.

काई वर्ग चाचणीच्या परिणामांवरून असे निदर्शनास येते की, सामाजिक विकासात असलेल्या सहभागानूसार भंडारा जिल्ह्यातील त्रीस्तरीय पंचायतराज व्यवस्थेमधील पदाधिकाऱ्यांदरम्यान सार्थक (P<0.05) फरक आहे. म्हणजेच भंडारा जिल्ह्यातील त्रीस्तरीय पंचायतराज व्यवस्थेमधील पदाधिकाऱ्यांमध्ये गावातील सामाजिक विकासात अंशत: सहभाग असणाऱ्या पदाधिकाऱ्यांची संख्या इतर पदाधिकाऱ्यांच्या तूलनेत महत्वपुर्णपणे अधिक आहे.

## निष्कर्ष

अध्ययनातील परीणामांवरून (सारणी क्रमांक १) असे निदर्शनास येते की, भंडारा जिल्ह्यातील त्रीस्तरीय पंचायतराज व्यवस्थेमधील पदाधिकाऱ्यांमध्ये उच्च माध्यमिक स्तरापर्यंत शिकलेल्या पदाधिकाऱ्यांची संख्या महत्वपुर्णपणे अधिक आहे व ८४.० टक्के पदाधिकाऱ्यांचे शैक्षणीक स्तर स्नातक स्तरापेक्षा कमी आहे.

तसेच केवळ ३२.७ टक्के पदाधिकारी त्यांच्या गावात अथवा शहरात उपलब्ध सामाजिक संस्थेत सदस्य आहेत (सारणी क्रमांक २). ५९.४ टक्के पदाधिकाऱ्यांद्वारे गावात अथवा शहरात उपलब्ध सामाजिक संस्थांच्या माध्यमातून सामाजिक समस्या सोडविण्यासाठी अंशतः प्रयत्न केले जाते (सारणी क्रमांक ३). ५६.७ टक्के पदाधिकाऱ्यांच्या मते त्यांचा सामाजिक विकासात अंशतः सहभाग होता (सारणी क्रमांक ४). या वरून असे स्पष्ट होते की भंडारा जिल्ह्यातील त्रीस्तरीय पंचायतराज व्यवस्थेमधील पदाधिकाऱ्यांचा सामाजिक कार्यात सहभाग अल्प प्रमाणात आहे व महत्वपूर्णपणे अधिक पदाधिकाऱ्यांचे शिक्षण स्नातक स्तरापेक्षा कमी आहे. यावरून भंडारा जिल्ह्यातील पंचायतराज व स्थानिक स्वराज्य संस्थांमधिल पदाधिकाऱ्यांचा शैक्षणिक दर्जा उंचावला नसल्यामुळे त्यांचा सामाजिक कार्यात सहभाग अल्प प्रमाणात असल्याचे निदर्शनास येते.

## संदर्भग्रंथ सूची


१) अग्रवाल., प्र. (२००८), भारत में पंचायतराज, ज्ञानगंगा प्रकाशन, दिल्ली
२) अमृतकर., प्र. (२००१), 'चंद्रपूर जिल्ह्यातील चंद्रपूर जिल्ह परिषद तसेच चंद्रपूर, वरोडा व राजूरा पंचायत समित्या अंतर्गत पंचायत राज संस्थामधील सदस्य व पदाधिकारी स्त्रियांचा सहभाग व भूमिकेबाबत अध्ययन' पी एच. डी. प्रबंध, नागपूर विद्यापीठ.
३) कश्यप., अ. (२०१०), भारत में पंचायतीराज, डिस्कवरी पब्लिशिंग हाऊस प्राईवेट लिमिटेड, नई दिल्ली.
४) कऱ्हाळे, वि., (२०११), नांदेड लिल्हा परिषदेतील आदिवासी नेतृत्वांचा अभ्यास, शोध प्रबंध स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड,
५) शर्मा., म. आणि शुक्ला, र. (२०११), 'पंचायतराज व्यवस्था नवीन ग्रामीण नेतृत्व का अविर्भाव', संपादक पी. पी. गौर, आर. के. मराठा अर्जुन पब्लिशिंग हाऊस, दिल्ली, २०११, पृ. क्र. ५८ ते ६७.
६) कुलकर्णी., ए.एम. (२००१), भारतातील स्थानिक शासन, मथुरा प्रकाशन, सांगली.
७) भोगे., कृ. (२०१५), महानगरपालिका प्रशासन, सकाळ करिअर मंत्र, दैनिक सकाळ, औरंगाबाद.
८) कौटिल्यीय अर्थशास्त्र्म, चौखम्बा विद्या भवन, वाराणसी प्रथम अध्याय १७ वॉ प्रकरण.
९) क्रोस., से. (१९२२), द डवेलपमंटे ऑफ सेल्फ गवर्नमेंट इन इंडिया, शिकागो युनिवर्सिटी प्रेस शिकागो
१०) कोतवाल आणि लेले (२००२), प्रतिनिधित्व राखीव जागा आणि स्त्रिया, प्रकाशबाळ, किशोर बेडकिहाड (संपा.) भारतीय राजकीय व्यवस्था प्रक्रीया आणि स्वरूप, आंबेडकर अकादमी सातारा, पृ. क्र. २०९
११) कुळकर्णी आणि श्रीनिवास (२००८), पंचायतराजची पंधरा वर्ष अवकाश कमी अडथळे जास्त, परिवर्तनाचा वाटसरू, पृ १०-१३.
१२) कोलते., पु.ये., (२००६), 'औरंगाबाद जिल्ह्यातील पंचायत राजव्यवस्थेत महिलांचा सहभाग' (१९९१ ते २००१) पीएच्.डी. शोधप्रबंध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.